शासकीय जाहिरात योजनांची अंमलबजाणी
कार्यपध्दती.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांकः मावज-२०१७/प्र.क्र.१५३/३४

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: १ जून २०१८

<u>वाचा</u>

1) **सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.पीयूबी-१०००/प्र.क्र.७३/२०००/३४, दिनांक १ मे, २००१**
2) **सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.मा.व ज.-२०१६/प्र.क्र.३९७/३४, दिनांक ५ जानेवारी, २०१७**
3) **शासन निर्णय क्रमांकः मावज-२०१७/प्र.क्र.१५३/३४, दि. २१ जुलै, २०१७**

प्रस्तावना :-

शासकीय योजनांची जाहिरात करण्यासाठी संबंधित विभागांनी माध्यम आराखडा तयार करुन त्याची अंमलबजावणी माहिती व जनसंपर्क, महासंचालनालयामार्फत करण्यासंदर्भात संदर्भ क्र.३ येथील दिनांक २१ जुलै, २०१७ च्या शासन निणर्यान्वये आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. सदर आदेशान्वये माध्यम आराखडा तयार करणे व त्यांची अंमलबजावणी याबाबतची कार्यपध्दती विहीत करण्यात आली आहे. सदर कार्यपध्दतीत सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याप्रमाणे शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

शासन निर्णय :-

माध्यम आराखडा तयार करणे व त्याची अंमलबजावणी यासंदर्भात वरील संदर्भ क्र.३ येथील दिनांक २१ जुलै, २०१७ रोजीच्या शासन निर्णयात क्रमांक ४ मध्ये नमूद केलेल्या "समितीने तयार केलेल्या माध्यम आराखडयास.........समिती हा आराखडा तयार करील." या परिच्छेदात खालील बाबी समाविष्ट करण्यात येत आहे.

४.१) हा आराखडा तयार करताना संबंधित विभागाचे सचिव अथवा त्यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी यांनी मा.मुख्यमंत्री यांचे विशेष कार्य अधिकारी (माध्यम सल्लागार) यांच्याशी चर्चा करावी व त्याकरिता संबंधित संचालक, (माहिती) यांनी आवश्यक ती मदत करावी.

४.२) तो आराखडा मा.मुख्यमंत्री यांचे विशेष कार्य अधिकारी यांच्या मार्फत मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या अवलोकनार्थ सादर करण्यात यावा.

४.३) मा.मुख्यमंत्री महोदयांच्या मान्यतेनंतर या आराखडयाची अंमलबजावणी माहिती व जनसंपर्क महासंचालनालय करील.

४.४) उर्वरित बाबी/कार्यपध्दती दिनांक २१ जुलै, २०१७ च्या शासन निर्णयाप्रमाणेच राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०६०११०४१०७३५०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ramkisan Narayanrao Musale

Digitally signed by Ramkisan Narayanrao Musale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e28f6332f6edfebdfb055bf154f99ec0b0d9e613209e20e7a215f026da6875ae, cn=Ramkisan Narayanrao Musale
Date: 2018.06.01 10:42:25 +05'30'

(रा.ना.मुसळे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१.राज्यपालांचे सचिव
२.मुख्यमंत्र्यांचे सचिव
३.मुख्यमंत्र्यांचे विशेष कार्य अधिकारी (माध्यम सल्लागार)
४.सर्व मंत्री/राज्यमंत्री/यांचे खाजगी सचिव
५.मुख्य सचिव/अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव
६.सर्व मंत्रालयीन विभाग
७.सर्व विभागीय आयुक्त
८.सर्व जिल्हाधिकारी
९.सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
१०.सर्व मंडळे/महामंडळे/स्थानिक स्वराज्य संस्था/शासनाच्या स्वायत्त संस्था
११.प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा,मुंबई
१२.प्रबंधक, उच्च न्यायलय, अपील शाखा, मुंबई
१३.प्रबंधक, लोकायुक्त आणि उप लोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई
१४.महालेखापाल, महाराष्ट्र १/२, (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर
१५. महालेखापाल, महाराष्ट्र १/२, (लेखापरिक्षा), मुंबई/नागपूर
१६.अधिदान व लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१७.सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख
१८ संचालक (माहिती), नागपूर-अमरावती
१९.संचालक (माहिती), महाराष्ट्र परिचय केंद्र, नवी दिल्ली
२० उप संचालक (माहिती), नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती,कोकण, कोल्हापूर विभाग
२१.सर्व जिल्हा माहिती अधिकारी
२२.सर्व उपसमिती कार्यालये,
२३. निवडनस्ती.